"गॉज कापड व बॅण्डेज कापड"
या बाबीची दरनिश्चिती बाबत.

# महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक. उसं/ भांखस /गॉज कापड व बॅण्डेज कापड/ दरनिश्चिती/ २०२२-२३/(१२)/२०२२/** सी-११८४२

**दिनांक:-** 18 NOV 2022

**वाचा :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग -४, दि.०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.२९/०९/२०२२ रोजीचे इतिवृत्त.**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका दि.०१/१२/२०१६ मधील परिच्छेद ५.१५ नुसार परिशिष्ट-१८ मध्ये अंध व अपंग संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. सदर संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समिती मार्फत करण्यात येते. त्यानुसार **"गॉज कापड व बॅन्डेज कापड"** या बाबीची **सन २०२२-२३** या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी खालील संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समिती दि.२९/०९/२०२२ रोजीच्या बैठकीत सदर बाबीचे निश्चित केलेले दर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहेत. सदर दर हे खालील संस्थांसाठी निश्चित करण्यात आले आहेत.

१) मेहरु मेहता अपंगोध्दार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, डॉ. बंदरवाला लेप्रसी हॉस्पीटल परिसर, येवले वाडी, कोंढवा बुद्रुक, पुणे- ४११ ०४८.
२) विदर्भ महारोगी सेवा मंडळ, श्री जगदंबा कुष्ट निवास, "तपोवन", जिल्हा अमरावती.

**"गॉज कापड व बॅण्डेज कापड"** या बाबींचे निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाबींचे नाव व विर्निदेश | पॅकींगचा आकार | दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १०० cm X२० m. | ३९०/- |
| २. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ९० cm X २० m. | ३५८/- |
| ३. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १००cm X १० m. | २२१/- |
| ४. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | १० cm X ४m. | १९/- |
| ५. | बॅन्डेज कापड (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | १५ cm X ४ m. | २५/- |
| ६. | गॉज क्लॉथ(As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ५० cm X १८ m. | १५०/- |

| अ.क्र. | बाबींचे नाव व विनिदेश | पॅकींगचा आकार | दर (रुपये) |
|---|---|---|---|
| ७. | गॉज क्लॉथ (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान ९० cm X १८ m. | २३७/- |
| ८. | गॉज क्लॉथ (As per Schedule F-II of Drugs and Cosmetics Act-१९४०) | थान १०० cm X १० m | १३८/- |

संस्थेस राखीव असलेल्या बाबींची वार्षिक उत्पादन क्षमता खालील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | उत्पादित वस्तुंचे नांव | मे. डॉ. मेहरु मेहता अंपगोद्धार औद्योगिक सहकारी सोसायटी मर्यादित, पुणे | मे. विदर्भ महारोगी सेवा मंडळ, अमरावती |
|---|---|---|---|
| १. | बॅन्डेज कापड | ०५.४० लाख मीटर | ०४.०० लाख मीटर |
| २. | गॉज क्लॉथ | १०.८० लाख मीटर | ०२.०० लाख मीटर |

संस्थेने उपरोक्त नमुद बाबींच्या उत्पादन क्षमतेच्या मर्यादेत पुरवठा करावा. संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई या विभागांनी उपरोक्त संस्थेस उत्पादन क्षमतेच्या प्रमाणात पुरवठा आदेश विभागून देण्याबाबत कार्यवाही करावी.

सदर दरनिश्चितीची **विधिग्राह्यता दि.३०.०४.२०२३** पर्यंत किंवा पुढील वर्षाचे दरनिश्चिती आदेश निर्गमित होईपर्यंत यापैकी जी कार्यवाही नंतर होईल तो पर्यंत ग्राह्य राहतील. गॉज कापड व बॅण्डेज कापड या बाबीसाठी जर वस्तू व सेवाकर (GST) लागू असेल, तर या बाबींकरीता GST हा वर नमूद केलेल्या दरावर अतिरिक्त राहील. सदर दर खरेदीदाराच्या कार्यालया पर्यंत मोफत पोहोच असे आहे.

**अंध व अपंग संस्थांनी स्वत: उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये. संस्थेच्या अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेले कामे पुर्ण करुन घ्यावेत.**

**पुरवठा कालावधी :-** मागणीपत्र मिळाल्या पासून ३० दिवसाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक राहील.

**देय रक्कमेबाबतच्या अटी:-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर मालाचे त्वरीत निरीक्षण करावे. निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या / खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तू पुरवठ्याच्या तारखे पासून १५ दिवसात करण्यात यावी. मालाचा निरीक्षण अहवाल प्राप्त झाल्या नंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच कार्यादेशानुसार नुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकार कार्यालयामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालाचा / वस्तूचा दर्जा व गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने करावी. ज्या संस्थांकडून वस्तूंचा पुरवठा करणे शक्य नसेल त्या संस्थांनी अशा वस्तूंची यादी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करणे आवश्यक राहील.

वरील संस्थांने शासकीय कार्यालयास केलेल्या पुरवठयाबाबतचा अहवाल वस्तूनिहाय दरमहा मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

सदरचे आदेश मा. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

(वि.मु.सिरसाठ)
**उद्योग सह संचालक (भां.ख.)**

**प्रति,**

१) विदर्भ महारोगी सेवा मंडळ, श्री जगदंबा कुष्ट निवास, "तपोवन", जिल्हा अमरावती.
२) मेहरु मेहता अपंगोध्दार औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, डॉ. बंदरवाला लेप्रसी हॉस्पीटल परिसर, येवले वाडी, कोंढवा बुद्रुक, पुणे- ४११ ०४८.
३) निवड नस्ती.